
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# ''शीतयुध्द सदानंद'' : एक शैलीवैज्ञानिक विचार

प्रा.प्रशांत चौधरी
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद




स्वातंत्र्योत्तर कालखंडात — त्यातही आणिबाणीनंतरच्या काळात नाविण्यपूर्ण लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये श्याम मनोहर यांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागते. 'हे ईश्वरराव... हे पुरूषोत्तमराव', 'कळ', 'खूप लोक आहेत', 'उत्सुकतेने मी झोपलो' ह्या कादंबऱ्या, तसेच अनेक कथा संग्रह, नाटके व अनुवाद लिहिणाऱ्या श्याम मनोहरांची ओळख त्यांच्या 'शीतयुध्द सदानंद' या कादंबरीने, आणि त्यावर आधारलेल्या नाटक व चित्रपटाने मराठी रसिकांना खास करून झाली प्रस्तुत कादंबरी तिच्या खास नाविण्यपूर्ण अशा भाषाशैलीमुळेही चिरस्मरणीय ठरली आहे. म्हणून भाषाशैली वैज्ञानिक दृष्टीकोनातून या कादंबरीवर विचार करण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न.

शैली ही एक वाङ्मयीन संज्ञा आहे. ''एखाद्या द्रव्याला विशिष्ठ माध्यमाद्वारे विशिष्ठ रूपांत प्रकट करण्याकरता वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्चयाची पध्दती म्हणजे शैली होय.'' येथे द्रव्य हा शब्द आशयद्रव्य या अर्थाने वापरला आहे.
कोणत्याही साहित्यकृतीत शैलीच्या अंगाने विचार करता भाषेचा वापर 'निवड' या स्वाभाविक मानवी प्रवृत्तीनुसार केलेला असतो. अनेक पर्याय उपलब्ध असताना विशिष्ठ ध्वनी, शब्द, शब्दरचना, वाक्यांश, वाक्यरचना त्यांचीच का निवड लेखक करतो, याचा शोध घेतला तर लक्षात असे येईल की, 'निवड' हा शैलीचा महत्वाचा धर्म आहे.
रूढ अथवा आदर्श भाषाप्रयोगापेक्षा वेगळे भाषा प्रयोग करणे, भाषेच्या माध्यमात हेतुनिष्ठ मोडतोड करणे आणि साध्या भाषेला वळण देणे, हा शैलीचा दुसरा धर्मा होय.
साध्या भाषेपेक्षा साहित्यिक भाषा अधिक आणणे व रूपाच्या संरचनेला भरून टाकणे, हा शैलीचा तिसरा धर्म होय. आणि, भाषावैशिष्ठ्यांना आवश्यक ते सर्व संदर्भ पूरविणे हा भाषेचा चौथा धर्म आहे. भालचंद्र नेमाड्यांनी सांगितलेल्या उपनिर्दिष्ठ चतुर्विध शैलीधर्मांपैकी पहिला, दुसरा व चौथा असे तीन धर्म 'शीतयुध्द सदानंद' मध्ये पहावयास मिळातात. विशिष्ठ शब्दांची, वाक्यांशांची वा वाक्यांची सहेतूक पुनरूक्ती श्याम मनोहरांनी आवर्जून केली आहे. कारण ही पुनरूक्तीच लेखकास अपेक्षित असणारा परिणाम साधतांना दिसते.

काही उदाहरणे
१) 'भट्टीचे इस्त्रीचे आठ दिवस वापरून मळके झालेले कपडे घातलेले दोन तरूण' हे वाक्य एकाच पृष्ठावर सलग तीन परिच्छेदात चार वेळो येते. तेही कादंबरीच्या दुसऱ्याच पृष्ठावर.
किंवा
२) 'एक डोळेवाला गरीब म्हातारा' हा वाक्यांश अनेकवेळा पुनरूक्त होताना दिसतो.
संवेदनाच्या आणि नैतिकतेच्या अंगाने समाजजीवनाला आलेला बधिरपणा हे कादंबरीच्या भाषाशैलीचे एक वैशिष्ठ्य आहे. अंगावर धावत येणाऱ्या तरूणांना

पाहून घाबरलेला सदानंद स्कुटरसह पडतो व शुध्द हरवतो. तेव्हा रस्त्यावर जात असणारे स्कुटरवर स्वार असणारे जोडपे आणि त्या निमित्ताने होणारा संवाद शैलीगत विशेषाचे खास उदाहरण म्हणता येईल. स्कूटरवरून आलेले ते कुटुंब पडलेल्या स्कुटरस्वारास न्याहाळतं, दोघा आई—बापाच्या मध्ये बसलेलं पोर विचारतं, ''काय झालंय आई'' तेव्हा काहीही प्रतिक्रिया न देता बाप स्कूटर पळवतो. येथे छोट्या पोरात संवेदना आहे, परंतु मोठ्यांत नाही, हे मध्यमवर्गीय वास्तव नेमकेपणानं आले आहे.

सायकलवर आलेल्या डबलशीट स्वारांचा आणि गोविंद—श्रीरंगचा संवादही या दृष्टीने पुरेसा बोलका आहे.

जगण्यातील निरर्थकतेची अर्थपूर्ण जाण ही कादंबरी वाचताना सतत होत राहते. पैसा आणि त्याची मध्यमवर्गीय मानसिकतेला असणारी प्रचंड ओढ दाखवून देताना भास्करराव, प्रकाशराव, सदानंद, उर्मिला, कुसुमताई यांच्यात होणारे संवाद याची प्रचिती आणून देतात. रट्टे खाण्याऐवजी त्यांनाच पैसे देऊ हा मार्ग निवडल्यानंतर किती पैसे द्यावयाचे यावरून वरील सर्वांत झडलेला संवाद अभ्यासण्यासारखा आहे. 'तीनशे काय, पाचशे काय, विशेष नाहीय. बाळाचं प्रेत पाडलंय. भावनेपेक्षा मोठा आकडा पाहिजे' हे कुसुमताईचे विधान आणि त्यानंतरच्या विधानांमधून व्यक्त होणारा उपहासगर्भ विनोद मध्यमवर्गाच्या मानसिकतेवर नेमके बोट ठेवतो. 'सोयीची आणि स्वस्त होत चाललेली माणूसकी' हे या कादंबरीचे आशयसूत्र भाषेच्या वैचित्र्यपूर्ण मांडणीतून, शब्दांच्या मोडतोडीतून लेखकाने नेमकेपणाने धरले आहे. किंबहुना लेखकाचे हे विशिष्ठ भाषातंत्रच या कादंबरीचा महत्वपूर्ण आधार आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

लेखकाच्या भाषेत गांभीर्य आहे, पण ते वास्तवाच्या थंडपणाची झालर घेऊन येते. मर्मभेदक विनोद आहे पण तो उपरोधाच्या अंगाने जाणारा व केवळ हसवण्यासाठी नसून पुनः मध्यमवर्गाच्या बोथट बनत चाललेल्या जाणिवांवर प्रकाश टाकणारा आहे.

कादंबरीच्या शेवटी श्रीरंग—गोविंदाला हे कळते की, ज्या सदाशिवच्या मेलेल्या मुलासाठी आपण एवढा उपद्व्याप केला, त्याच्या बायकोस दिवस गेले आहेत, तेव्हा स्वत:लाच हरणारे श्रीरंग—गोविंद लेखक आपल्या समोर आणतो. एका मध्यमवर्गीय कटुसत्याची जाणीव करून देणारी ही कादंबरी स्वातंत्र्योत्तर काळातील भाषावैज्ञानिक कादंबरीच्या इतिहासातील एक लक्षणीय घटना ठरावी, इतकी महत्वपूर्ण आहे.

## समारोप :—

श्याम मनोहर यांची ही कादंबरी साहित्यकृतीचा जीवनधर्म आणि कलामर्ध, या दोन्ही तत्तवांच्या दृष्टीने लक्षणीय आहे. मध्यवर्गीय मानवी जाणीवांचे दर्शन घडविण्यासाठी आवश्यक असणारी कलात्म समज मनोहरांकडे पुरेपूर असल्यामुळे ही कलाकृती रसिकांच्या मनाचा ताबा घेते व स्वाभविकच त्यांना अंतर्मुखही बनविते.